# चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
## प्रेस नोट दिनांक २५/०७/२०१९

**सामाजिक सलोखा राखणेबाबत शांतता कमिटी व महिला दक्षता समिती सदस्यांची बैठक घेतलेबाबत.**

दिनांक २५/०७/२०१९ रोजी १०/३० ते १२/३० वा दरम्यान वपोनि. कृष्णा इंदलकर, चंदननगर पो.स्टे. पोनि गुन्हे श्री. सत्यवान पाटील यांनी स्वतः व पोलीस स्टेशन कडील कर्मचारी पोहवा हरी कदम, पोना. अनिरुध्द जायभाय यांनी मिळुन हददीतील शांतता कमिटी, महिला दक्षता समिती सदस्य यांची बैठक घेतली, तसेच सुरक्षीततेसंबधाने बैठक घेऊन सामाजिक ऐक्याचा संदेश जनतेमध्ये पोहचण्याचे काम करणेबाबत, सायबर गुन्हे, लैंगीक अपराध, रॅगींग यासंबधाने चर्चा करुन मार्गदर्शन केले. त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे शंका व अडचणीचे निरसन केले. सदर मिटींग दरम्यान त्यांना पोलीस आयुक्तालयामध्ये मुला-मुलीसाठी स्थापन केलेल्या पोलीस काका, भरोसा सेलच्या योजनेची माहीती देवुन, योजनेचा उपयोग करुन घेणेसाठी मार्गदर्शन केले. महीलांसाठी १०९१ हेल्पलाईन नंबरबाबत माहीती देऊन त्यावर अडचणी कळविणेबाबत आवाहन केले. अडचणींचे दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधुन मदत मागणेसाठी माहिती दिली. सदर ठिकाणी ४० ते ५० असे शांतता कमिटी व महिला दक्षता समिती सदस्य हजर होते.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर, पोनि गुन्हे श्री. सत्यवान पाटील, कर्मचारी पोहवा हरी कदम, पोना. अनिरुध्द जायभाय यांनी केलेली आहे.



